# मार्शल अर्जन सिंग यांच्या नावे आता विद्यापीठात अध्यासन

## अध्यासनासाठी भारतीय हवाई दलाकडून १ कोटींची देणगी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** भारतीय हवाई दलाच्या सहकार्याने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग' यांच्या नावाने अध्यासनाची स्थापना करण्यात येणार आहे. अध्यासनाच्या स्थापनेसाठी हवाई दलाच्या मुख्यालयाकडून एक कोटींची देणगी देण्यात येणार असून त्या बाबतचा सामंजस्य करार येत्या २९ फेब्रुवारी रोजी केला जाणार आहे. या प्रकारचे हे देशातील पहिलेच अध्यासन ठरणार आहे.

मार्शल ऑफ द एअर फोर्स (पंचतारांकित रँक) हे पद भूषवणारे अर्जन सिंग हे एकमेव अधिकारी आहेत. त्यांनी १९६५ सालच्या भारत-पाकिस्तान युद्धात निर्णायक भूमिका बजावली होती. त्यांच्या कामगिरीसाठी केंद्र सरकारकडून 'पद्मविभूषण' सन्मानाने गौरवण्यात आले होते. तसेच १९६६ मध्ये एअर चीफ मार्शल या पदी बढती देण्यात आली होती. त्यांच्या नावाने हे अध्यासन विद्यापीठात सुरू करण्यात येत आहे.

'मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग अध्यासन राष्ट्रीय सुरक्षा आणि सामरिक अभ्यासासंदर्भात सशस्त्र दले आणि शिक्षण संस्था यांच्यात परस्पर सहकार्य निर्माण करण्यासाठी, संशोधन-अभ्यास करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल,' असे विद्यापीठाच्या सामरिक आणि संरक्षणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. विजय खरे यांनी सांगितले.



### अध्यासनाच्या स्थापनेची उद्दिष्टे

- राष्ट्रीय सुरक्षा, संरक्षण या विषयी नागरिकांमध्ये रस निर्माण करणे
- राष्ट्रीय सुरक्षेसंबंधित समकालीन, भविष्यकालीन हितसंबंधांच्या सुरक्षाभिमुख विषयांवर संशोधन-अभ्यास करणे
- राष्ट्रीय सुरक्षा आणि जागतिक सुरक्षितता या विषयावर चर्चासत्रे, कार्यशाळांचे आयोजन करणे

विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागात १९९५ मध्ये भूदलातर्फे छत्रपती शिवाजी अध्यासनाची स्थापना करण्यात आली आहे. भारतीय भूदल आणि दक्षिण कमांड यांच्या समन्वयाने संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागात 'रेसिडंट स्कॉलर' कार्यक्रम राबवला जातो. त्यासाठी विविध धोरणात्मक विषयांवर भूदलाचे अधिकारी विभागाच्या समन्वयाने काम करत आहेत. तशाच पद्धतीचा सामंजस्य करार आता अर्जन सिंग अध्यासनाच्या निमित्ताने भारतीय हवाई दलासह होत आहे.

> 'मार्शल ऑफ द एअर फोर्स अर्जन सिंग' यांच्या नावे विद्यापीठात अध्यासनाची स्थापना होणे अतिशय अभिमानाचा आणि आनंदाचा प्रसंग आहे. विद्यापीठाचा सामरिक आणि संरक्षणशास्त्र विभाग लष्कराशी या पूर्वीच जोडला गेला आहे. या अध्यासनाद्वारे हवाई दलाशी जोडला जाईल. भविष्यकाळात नौदलाशीही जोडले जाण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत.
>
> **- डॉ. नितीन करमळकर**, कुलगुरु

लोकसत्ता Fri, 21 February 2020
https://epaper.loksatta.com/c/49238044